## निवडक

### भारतीय संघाच्या खराब क्षेत्ररक्षणावर हॅडिनची टीका



**नवी दिल्ली, दि. २८:** इंग्लंडविरुद्ध लीड्स येथे झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यात टीम इंडियाच्या झेलबाजीने निराशा केली असून, एकूण आठ झेल गमावल्यामुळे भारताच्या विजयाच्या संधी धुसर झाल्या. यशस्वी जयस्वाल एकट्याने चार संधी गमावल्याने विशेषतः लक्ष वेधले गेले. या पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलियाचा माजी यष्टीरक्षक-फलंदाज ब्रॅड हॅडिनने भारतीय संघाच्या क्षेत्ररक्षण क्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करत नेतृत्वाकडून सकारात्मक बदलांची गरज व्यक्त केली आहे. एका स्पोर्ट्स पॉडकास्टमध्ये बोलताना हॅडिन म्हणाला की , जगातील प्रत्येक यशस्वी संघाची एक गोष्ट कायम समान राहिली आहे . ती म्हणजे उत्कृष्ट क्षेत्ररक्षण. भारतीय संघाकडे प्रतिभेची कमतरता नाही, पण त्यांच्या झेलबाजीचा दर्जा सध्या अत्यंत निराशाजनक आहे. शुभमन गिलने आता संघात एक जबाबदारी घेतली पाहिजे. केवळ तांत्रिक तयारी पुरेशी नाही; क्षेत्ररक्षणात उत्कृष्टता ही वृत्तीवर अवलंबून असते.

हॅडिनने आयपीएल २०२५ दरम्यान झालेल्या खराब क्षेत्ररक्षणाचाही उल्लेख केला आणि असे सांगितले की या झेलांच्या चुकांचे पडसाद आंतरराष्ट्रीय स्तरावरही उमटत आहेत.

हॅडिनने विशेषत: १४ वर्षीय उदयोन्मुख फलंदाज वैभव सूर्यवंशीचा उल्लेख केला. सूर्यवंशीची फलंदाजी अप्रतिम आहे, हे खरे. पण जर तो खरोखर उत्तम आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू व्हायचा असेल, तर त्याने त्याच्या क्षेत्ररक्षणात सुधारणा केलीच पाहिजे. केवळ बॅटिंगमुळे तुम्ही यशस्वी होत नाही; संपूर्ण खेळात योगदान महत्त्वाचे असते.

त्याच्या मते, भारताने आता जागतिक दर्जाचे क्षेत्ररक्षण करणारा संघ होण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. बॉलिंग, बॅटिंगमध्ये तुम्ही आधीच उत्कृष्ट आहात. पण जर तुम्ही जगातील सर्वोत्तम क्षेत्ररक्षण संघ झाला, तर भारतीय संघाला रोखणे कोणालाही शक्य होणार नाही.

हॅडिनने पहिल्या कसोटीत भारताच्या दुसऱ्या डावातील कोसळलेल्या फलंदाजीवरही भाष्य केले. भारताची टॉप ऑर्डर सातत्याने दबावात आहे. जर ती सुरुवात ठोस देऊ शकत नसेल, तर खालच्या फळीवर अधिक भार येतो आणि सामन्याचा तोल ढासळतो, असे त्याने स्पष्ट केले.

# ऑस्ट्रेलियाचा वेस्ट इंडिजवर १५९ धावांनी दणदणीत विजय

**बार्बाडोस, दि. २८:**

ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज आणि आरसीबीचा स्टार खेळाडू जोश हेझलवूडच्या प्रभावी कामगिरीच्या जोरावर पाहुण्या ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजविरुद्धची पहिली कसोटी केवळ तीन दिवसांत १५९ धावांनी जिंकली. ३११ धावांचे लक्ष्य देण्यात आलेल्या वेस्ट इंडिजच्या फलंदाजीची अक्षरशः वाताहत झाली, कारण अवघ्या ३३.४ षटकांत संपूर्ण संघ १४१ धावांत गारद झाला.

हेझलवूडने ४३ धावांत ५ बळी घेत सामन्याचे चित्र स्पष्ट केले. मिशेल स्टार्कनेही सुरुवातीला माजी कर्णधार क्रेग ब्रेथवेटला बाद करून यजमानांच्या डावाची दुरवस्था करण्याची नांदी केली. त्यानंतर हेझलवूडने सलग चेंडूंवर जॉन कॅम्पबेल आणि पदार्पण करणाऱ्या ब्रँडन किंगला बाद करत दबाव आणला.

दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाकडून ॲलेक्स केरी (६५), ट्रॅव्हिस हेड (६१) आणि ब्यू वेबस्टर (६३) यांनी अर्धशतके झळकावली. विशेष म्हणजे, हेड आणि वेबस्टरने पाचव्या विकेटसाठी १०२ धावांची भागीदारी केली.

वेस्ट इंडिजकडून शामर जोसेफने ८७ धावांत ५ बळी घेत चांगली गोलंदाजी केली, पण संघाच्या झेल टिपण्यात झालेल्या सात चुका महागात पडल्या.



विशेषतः पहिल्या दिवशी चार झेल गाळले गेले आणि दुसऱ्या दिवशीही काही निर्णायक संधी वाया गेल्या.

शामर जोसेफच्या अपवादाने वेस्ट इंडिजच्या गोलंदाजीला सातत्य नव्हते. त्याने शेवटच्या विकेटपर्यंत झुंज दिली . त्यात त्याने २२ चेंडूत ४४ धावांची आक्रमक खेळी केली आणि नॅथन लायनला षटकार मारून दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, लायनने लगेच प्रत्युत्तर देत जेडेन सील्सला पहिल्याच चेंडूवर बाद करत सामना संपवला. जस्टिन ग्रीव्हज ३८ धावांवर नाबाद राहिला.

सामना संपल्यानंतर बोलताना हेझलवूड म्हणाला, या खेळपट्टीवर यश मिळवायचे असेल तर योग्य क्षेत्रांवर सातत्याने मारा करणे आणि संयम राखणे हेच महत्त्वाचे होते. चेंडूत थोडीफार स्किडिंग होती, तर काही वेळा चेंडू उसळत होता, यामुळे फलंदाज गोंधळले.

दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाने स्पष्टपणे आक्रमक दृष्टिकोन घेतला होता. हेड आणि वेबस्टरने आदल्या दिवशीची सांभाळून ठेवलेली घडी दुसऱ्या दिवशी फटकेबाजीने पुढे नेत लंचनंतर वेगात धावा फटकावल्या. हेडला जोसेफने एलबीडब्ल्यू केले असले तरी, काही वेळ आधीच झेलबाजीची चूक झाली नसती तर त्याचा आऊटपूर्वीच शेवट झाला असता.

अखेरीस, हेझलवूडने मैदानात पुन्हा येत जोमेल वॉरिकनला बाद केले आणि ऑस्ट्रेलियाने वर्चस्वाची मोहोर उमटवली. स्टार्कनेही उत्तम साथ दिली. शेवटच्या विकेटसाठी जोसेफ आणि ग्रीव्हज यांनी थोडी झुंज दिली, पण दोन दिवस शिल्लक असतानाच सामना संपुष्टात आला.

## गौतम गंभीरवर जिंकण्यासाठी दबाव वाढला

**नवी दिल्ली, दि. २८:**



भारताच्या कसोटी संघाच्या अपयशामुळे प्रमुख प्रशिक्षक गौतम गंभीर याच्यावर दबाव निर्माण झाला असून, माजी क्रिकेटपटू आणि समालोचक आकाश चोप्रा याने गंभीरच्या भूमिकेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताचा पराभव झाला. हेडिंग्ले येथे पाचव्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात झालेल्या या पराभवाने भारताने सामना पूर्णतः हातात असूनही गमावल्याचा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे, भारताने या सामन्यात पाच शतके झळकावली होती आणि एकूण ८०० हून अधिक धावा केल्या होत्या.

या पराभवामुळे भारताच्या गेल्या नऊ कसोटी सामन्यांमध्ये सातवा पराभव नोंदवला गेला आहे. त्यामुळे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याच्या कामगिरीबाबत टीका वाढू लागली आहे. आकाश चोप्राने त्याच्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, गौतम गंभीरवर प्रचंड दबाव आहे. त्याच्या नेतृत्वाखाली कसोटी संघ सातत्याने पराभूत होत आहे. त्याने बांगलादेशविरुद्ध दोन आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक सामना जिंकला आहे, पण न्यूझीलंडविरुद्ध तीन, ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन आणि आता इंग्लंडविरुद्धही एक सामना गमावला आहे.

चोप्रा पुढे म्हणाला की, जर ही मालिका भारत हरला, तर गंभीरचे कसोटी क्रिकेटमधील भवितव्य धोक्यात येऊ शकते. हा दौरा निर्णायक ठरणार आहे. संघ व्यवस्थापनाला आवश्यक त्या खेळाडूंची निवड केली गेली आहे, त्यामुळे आता कोणतेही कारण चालणार नाही. निकाल हवा. काळजी घेण्याचे दिवस गेले.

दरम्यान, इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या पराभवानंतर गौतम गंभीरने संघाच्या तरुण गोलंदाजांची पाठराखण केली आहे. भारताने स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहला संपूर्ण मालिकेसाठी उपलब्ध ठेवण्यासाठी फक्त तीन कसोटींमध्ये खेळवण्याचे धोरण स्वीकारले आहे, कारण त्याच्या पाठीच्या दुखण्याची पार्श्वभूमी आहे. गंभीरने बर्मिंगहॅममध्ये होणाऱ्या दुसऱ्या कसोटीत विजय मिळवून मालिकेत पुनरागमन करण्यावर भर दिला असून, धोरण कायम ठेवण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे बुमराह दुसऱ्या कसोटीत सहभागी होणार नाही, अशी शक्यता आहे. दुसरी कसोटी २ जुलै रोजी एजबॅस्टन येथे सुरू होणार आहे. भारतासाठी ही मालिका केवळ पुनरागमनाची नाही, तर गंभीरच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठीही कसोटी ठरणार आहे.

## श्रीलंकेचा बांगलादेशवर डावाने विजय

**कोलंबो, दि. २८:**

श्रीलंकेने शनिवारी येथे झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात बांगलादेशचा डाव आणि ७८ धावांनी पराभव करत दोन सामन्यांची मालिका १-० अशी आपल्या नावे केली. प्रभात जयसूर्याच्या भेदक फिरकीसमोर बांगलादेशचा दुसरा डाव अवघ्या १३३ धावांत आटोपला.

बांगलादेशने चौथ्या दिवशी ६ बाद ११५ अशा स्थितीत खेळाला सुरुवात केली, मात्र त्यांच्या फलंदाजांनी निर्णायक प्रतिकार करता आला नाही. डावखुरा फिरकीपटू जयसूर्याने पाच बळी टिपत पाहुण्यांच्या पराभवावर शिक्कामोर्तब केले.

पहिल्या डावात विकेटशून्य राहिलेल्या जयसूर्याने दुसऱ्या डावात केवळ ५६ धावांत ५ बळी घेतले. सकाळच्या सत्रातील त्याच्या दुसऱ्याच षटकात लिटन दासला (१४) यष्टीरक्षकाकडे झेल देण्यास भाग पाडत त्याने बांगलादेशच्या शेवटच्या आशा मोडून काढल्या. यानंतर पाहुण्यांच्या शेवटच्या पाच विकेट केवळ ११ षटकांत कोसळल्या.

श्रीलंकेचा हा विजय जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला असून त्यांना बहुमूल्य गुण मिळाले आहेत.

दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करत ४५८ धावा फटकावल्या. सलामीवीर पथुम निस्सांकाने १५८ धावांची संयमी आणि शैलीदार खेळी करत



मालिकेतील सलग दुसरे शतक झळकावले. दिनेश चंडिमल (९३) आणि कुसल मेंडिस (८४) यांनी प्रभावी साथ देत दुसऱ्या डावात २११ धावांची भक्कम आघाडी मिळवून दिली.

श्रीलंकेचा कर्णधार धनंजय डी सिल्वाने नाणेफेक गमावूनही संघाला विजय मिळवून देणे हे संघाच्या आत्मविश्वासासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले. दोन सामन्यांमधील कामगिरीत स्पष्ट फरक होता. हा विजय संघासाठी मोठा मनोबलवर्धक आहे, असे त्यांनी सामन्यानंतर सांगितले.

पहिल्या कसोटीत दोन शतक झळकावणाऱ्या कर्णधार नजमुल हुसेन शांतो याला दुसऱ्या डावात डी सिल्वाने २-१३ च्या कामगिरीत बाद करत बांगलादेशला अडचणीत टाकले. शांतोने पराभवानंतर निराशा व्यक्त करत म्हटले, आमच्याकडे संधी होत्या पण आम्ही फलंदाज म्हणून चुका केल्या.

पहिल्या डावात बांगलादेशने २४७ धावा केल्या होत्या, पण श्रीलंकेच्या भेदक माऱ्यापुढे दुसऱ्या डावात कोणीही अर्धशतकही करू शकला नाही. फक्त मुशफिकुर रहीमने (२६) थोडासा प्रतिकार केला, पण जयसूर्याने त्याला बाद करत बांगलादेशच्या डावाचा शेवट जवळ आणला. या कसोटीनंतर दोन्ही संघ मर्यादित षटकांच्या मालिकेकडे वळतील. या मालिकेत तीन एकदिवसीय सामने व तीन टी-२० सामने खेळवले जाणार असून पहिला एकदिवसीय सामना येत्या बुधवारी खेळवण्यात येईल.

## विम्बल्डनपूर्वी गॉफ आणि सबालेन्का यांच्यातला वाद मिटला

**लंडन, दि. २८:**

फ्रेंच ओपननंतर सामाजिक माध्यमांवर परस्पर टोलेबाजी करत चर्चेत आलेल्या डब्ल्यूटीए टूरवरील अव्वल दोन टेनिसपटू कोको गॉफ आणि आर्यना सबालेन्का यांनी अखेर वाद मिटवत विम्बल्डनपूर्वी एकमेकांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले आहेत.

फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत अमेरिकन खेळाडू गॉफने सबालेन्काचा ६-७, ६-२, ६-४ असा पराभव करत जेतेपद पटकावले होते. त्या सामन्यानंतर सबालेन्काने आपल्या पराभवाचे खापर स्वतःच्या चुकांवर फोडले होते, पण गॉफच्या कामगिरीबाबत कमी लेखणाऱ्या तिच्या विधानांमुळे वादाला तोंड फोडले होते.

त्यानंतर सबालेन्काने पत्रकार परिषदेत म्हटले होते की, गॉफने अविश्वसनीय खेळ केल्यामुळे नव्हे, तर मी खूप चुका केल्या म्हणून ती सामना जिंकली. एवढेच नव्हे तर, जर इगा स्विएटेकने मला हरवले असते, तर तिने अंतिम सामना सहज जिंकला असता, असे वक्तव्यही तिने केले होते.

गॉफने यावर प्रतिक्रिया देताना सांगितले होते की, आर्यना गेल्या काही आठवड्यांत अतिशय उत्तम खेळ करत होती, त्यामुळे तीच अंतिम फेरीसाठी फेव्हरिट होती. पण सामना हा आकड्यांपलीकडे जाऊन खेळला जातो.

मात्र, या दोघींनीही पुढे वाद मिटवून मैत्रीचा हात पुढे केला आहे. सबालेन्काने आपल्या विधानाबद्दल



माफी मागताना स्पष्ट केले, ते वक्तव्य पूर्णपणे अव्यावसायिक होते. त्या क्षणी मी माझ्या भावनांना आपल्यावर हावी होऊ दिले. मी कोकोला वैयक्तिकरित्या माफी मागून हे स्पष्ट केले.

तिने पुढे सांगितले, आपण सगळेच चुका करतो. मी एक माणूस आहे, आणि अजूनही शिकते आहे. कधी कधी नियंत्रण सुटते, फरक इतकाच की माझ्या चुका संपूर्ण जग पाहत असते.

विम्बल्डनपूर्वीच्या तयारीदरम्यान या दोघींनी एकत्र प्रशिक्षण घेतले. त्या सत्रात त्यांनी एकत्र टिकटॉक डान्स' सादर केला, ज्यामध्ये दोघींचे सलोख्याचे सूर पाहायला मिळाले. गॉफने तो व्हिडिओ शेअर करत लिहिले: ऑलिव्ह ब्रँन्च वाढवला आणि स्वीकारला गेला!

तिने तिच्या चाहत्यांनाही शांततेचे आवाहन करत म्हटले, आम्ही आता ठिक आहोत, त्यामुळे तुम्हीही तसेच वागले पाहिजे.

सध्या डब्ल्यूटीए क्रमवारीत अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या या दोघींमध्ये विम्बल्डनमध्ये अंतिम लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## नीरज चोप्रा पुन्हा जागतिक क्रमवारीत अव्वल

**नवी दिल्ली, दि. २८:**

भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याने पुन्हा एकदा जागतिक ॲथलेटिक्स रँकिंगमध्ये अव्वल स्थान पटकावले असून, पाकिस्तानचा ऑलिंपिक पदकविजेता अर्शद नदीम चौथ्या क्रमांकावर आहे.

जागतिक ॲथलेटिक्सने जाहीर केलेल्या ताज्या रँकिंगनुसार, नीरजने १४४५ गुणांसह पुरुषांच्या भालाफेकीत पहिला क्रमांक मिळवला आहे. ग्रेनेडाच्या अँडरसन पीटर्सला मागे टाकत नीरजने नऊ महिन्यांनंतर पुन्हा शिखर गाठले आहे. पीटर्सकडे सध्या १४३१ गुण आहेत.

टोकियो ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता नीरजने २०२४ मध्ये दुखापतीमुळे काही काळ स्पर्धांपासून दूर राहावे लागले होते. त्यानंतर सप्टेंबरमध्ये त्याने जागतिक क्रमवारीतील अव्वल स्थान गमावले होते. मात्र, २०२५ मध्ये पूर्णतः तंदुरुस्त झाल्यानंतर त्याने सातत्यपूर्ण कामगिरी करत पुन्हा सर्वोच्च स्थान प्राप्त केले आहे.

नीरजने यावर्षी एप्रिलमध्ये दक्षिण आफ्रिकेतील पॉच इन्व्हिटेशनल स्पर्धेत विजय मिळवत हंगामाची सुरुवात केली. त्यानंतर मे महिन्यात दोहा डायमंड लीगमध्ये ९०.२३ मीटरचा भालाफेक करत दुसरे स्थान




मिळवले आणि नवीन राष्ट्रीय विक्रम नोंदवला. यामुळे तो प्रतिष्ठित ९० मीटर क्लब'मध्ये सामील झाला आहे.

यानंतर पोलंडमधील जानूझ कुसोसिन्स्की मेमोरियल स्पर्धेत त्याला पुन्हा दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. मात्र जूनमध्ये पॅरिस डायमंड लीगमध्ये ८८.१६ मीटरच्या भालाफेकीसह त्याने पुन्हा विजयी घोडदौड सुरू केली. ऑस्ट्रावामधील गोल्डन स्पाइक स्पर्धेतसुद्धा त्याने सुवर्णपदक पटकावले.

या सर्व प्रमुख स्पर्धांमध्ये नीरजने सातत्याने अँडरसन पीटर्सपेक्षा चांगली कामगिरी केली. मात्र, यंदाच्या हंगामात त्याची अर्शद नदीमविरुद्ध अद्याप थेट लढत झालेली नाही. दोघांमध्ये संभाव्य लढत सप्टेंबरमध्ये होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, २०२५ हंगामात आतापर्यंत सर्वोत्तम भालाफेक करणारा खेळाडू जर्मनीचा ज्युलियन वेबर ठरला असून, त्याने दोहा डायमंड लीगमध्ये ९१.०६ मीटरचा प्रयत्न केला होता. सध्या तो जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर आहे.

अर्शद नदीम १३७० गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. टोकियो ऑलिंपिक रौप्यपदक विजेता झेक प्रजासत्ताकाचा जाकुब वडलेजच याला अव्वल पाचमधील स्थान मिळाले आहे.

नीरज चोप्राने ५ जुलै रोजी होणाऱ्या 'एनसी क्लासिक' स्पर्धेचे आयोजन केले असून, या स्पर्धेमध्ये जगातील अव्वल थ्रोअर्स भारतात खेळणार आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून भालाफेक खेळाला देशात अधिक लोकप्रियता मिळावी, हा त्यामागील उद्देश आहे.

## भारत अंडर-१९चा इंग्लंडवर दणदणीत विजय !

**होव्ह (इंग्लंड), दि. २८:**

भारताच्या १४ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने १९ चेंडूत ४८ धावांची झंझावाती खेळी करत इंग्लंड अंडर-१९ संघाविरुद्ध भारताला पहिल्या युवा एकदिवसीय सामन्यात सहा गडी राखून विजय मिळवून दिला. विजयासाठी दिलेल्या १७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताच्या १९ वर्षांखालील संघाने केवळ १५६ चेंडू राखून सहज विजय मिळवला.

सूर्यवंशीने आपल्या आक्रमक फलंदाजीने सामन्याचा पूर्ण रंग बदलला. पाच षटकार आणि तीन चौकारांच्या जोरावर त्याने केवळ १८ चेंडूत ४८ धावा करत संघाला भक्कम सुरुवात करून दिली. याआधीच आयपीएलमध्ये आपल्या कामगिरीने लक्ष वेधून घेतलेल्या या युवा फलंदाजाने इंग्लंडच्या भूमीत पुन्हा एकदा आपली छाप सोडली.

कर्णधार आयुष म्हात्रेच्या साथीनं भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक धोरण अवलंबले. म्हात्रेने जबाबदारीने



**वैभव सूर्यवंशीच्या झंझावाती खेळी !**

खेळ करत सलामी दिली, तर नॉन-स्ट्रायकर एंडवर असलेल्या सूर्यवंशीने सुरुवातीपासूनच इंग्लंडच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला.

त्याच्या आक्रमक फटकेबाजीपुढे जॅक होम आणि जेम्स मिंटो यांसारखे गोलंदाज निष्प्रभ ठरले. तथापि, राल्फी अल्बर्टच्या चेंडूवर सूर्यवंशी स्लॉग-स्वीपमध्ये बाद झाला आणि केवळ दोन धावांनी अर्धशतक हुकले.

यष्टीरक्षक अभिज्ञान कुंडूने नाबाद ४५ धावांची संयमी खेळी करत विजयावर शिक्कामोर्तब केले. त्याच्या खेळीने भारताला विजयाकडे नेताना स्थैर्य दिले. इंग्लंड अंडर-१९ संघाने प्रथम फलंदाजी करत ४२.२ षटकांत १७४ धावा केल्या होत्या. त्यांच्याकडून रॉकी फ्लिंटॉफने (५६) आणि इसाक मोहम्मदने (४२) सर्वाधिक योगदान दिले. विशेष म्हणजे रॉकी हा इंग्लंडचा माजी आंतरराष्ट्रीय अष्टपैलू अँड्र्यू फ्लिंटॉफचा पुत्र आहे.

भारताच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच अचूक मारा करत इंग्लंडच्या डावाला खिंडार घातले. कनिष्क चौहानने ३/२० अशी कामगिरी करत आघाडी घेतली. हेनिल पटेल (२/४१), आरएस अम्ब्रीश (२/४२) आणि मोहम्मद इनान (२/३७) यांनीही प्रत्येकी दोन बळी घेत इंग्लंडचा डाव आटोपता घेतला.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २९७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 297 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .